REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
(टपाल हंशील माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख ४ डिसेंबर, १९४० अंक ४८

ऐकुनि किंवा वाचुनि नांवा
खुषी लागते अधीर जीवा,
हांसू येई समोर दिसतां,
हास्य नाचरे चाल बघतां,
आविर्भावा टाळ्या घेती,
हास्यसागरा येई भरती,
शब्द उमटतां तोंडुनि त्यांच्या,
उसळति लाटा हास्य-भरतिच्या;
★ ★ ★
'कोण?' म्हणोनि कराल प्रश्ना,
उत्तर एकच, "दामुअण्णा—"



नवयुग चित्रपट लि. चा संपूर्ण मराठी विनोदी बोलपट

"लग्न पहावं करून"

भूमिकाः दामुअण्णा मालवणकर
जोग, शकुंतला, दमयंती

दिग्दर्शकः विनायक

प्रो. चिं. वि. जोशी यांनीं निर्मिलेल्या चिमणराव या भूमिकेवर आधारलेली कथा.

संवाद–पटकथाः वि. स. खांडेकर.

छायालेखनः पांडुरंग नाईक.

'पिअरलेस' प्रकाशने

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि. पुणें २

## नोटीस.

नोटीस देण्यांत येतें, कीं,

दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेडच्या भागीदारांची सहावी वार्षिक सर्वसाधारण सभा सिंडिकेटच्या (९८०, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, कॉमनवेल्थ बिल्डिंग, पुणें २, येथील) रजिस्टर्ड कचेरींत रविवार ता. २२ डिसेंबर, १९४० रोजीं दुपारीं ३ (स्टॅं. टा.) वाजतां भरविण्यांत येणार असून त्या वेळीं खालील कामांचा विचार होईल.

१. ता. ३० सप्टेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षाबद्दलचा डायरेक्टर्स यांचा अहवाल व ऑडिटर्स यांनीं तपासून बरोबर असलेबद्दलचा शेरा मारलेला ताळेबंद व नफातोटापत्रक स्वीकारणें.

२. डिव्हिडंड देण्यास मंजुरी देणें.

३. प्रो. व्ही. जी. काळे, दिवाण बहादूर एन. सी. लिमये, श्री. आर. सी. सोहोनी व श्री. ए. पी. कोंडेदेशमुख या चौघा डायरेक्टरांची चालूं सालीं निवृत्त होण्याची पाळी असल्यामुळें ते निवृत्त होत आहेत. त्यांचे जागीं चार डायरेक्टर्स निवडणें. सदर निवृत्त होणारे डायरेक्टर्स फेर निवडणुकीस पात्र असलेमुळें ते पुनः निवडणुकीस उभे आहेत.

४. १९४०–४१ सालाकरितां ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मेहनताना निश्चित करणें.

५. या शिवाय मे. अध्यक्षसाहेब यांचे परवानगीनें पुढें येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

कंपनीची शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. १६ डिसेंबर १९४० ते २९ डिसेंबर १९४० अखेर (दोन्हीं दिवस धरून) बंद राहातील.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकुमावरून,
सी. जी. आगाशे, ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजन्टस्.

पुणें, ता. २४ नोव्हेंबर, १९४०.

सूचना—भागीदारांच्या सर्वसाधारण सभेनें ताळेबंद मंजूर केल्यापासून एक महिन्यानंतर जाहीर केलेलें डिव्हिडंड देण्यांत येईल.

# विविध माहिती

### सर फ्रेड्रिक साइक्स ढाल

मुंबई प्रांतांतील प्रत्येक विभागांतील सर्वोत्कृष्ट ग्रामसुधारणा करणाऱ्या खेड्यास वरील ढाल देण्यांत येते. त्याप्रमाणें दक्षिण विभागांतील विजापूर जिल्ह्यांतील शिरूर गांवास ही ढाल मिळाली आहे.

### रिझर्व्ह बँकेच्या लोकल बोर्डाची निवडणूक

रिझर्व्ह बँकेच्या पश्चिम विभागाच्या लोकल बोर्डाच्या पांच जागा भरावयाच्या होत्या, त्यासाठीं पांचच अर्ज आले. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, श्री. कस्तुरभाई लालभाई, श्री. चुनीलाल भाईचंद मेहता, मि. आर. पी. मसानी व सर सुलतान चिनॉय हे त्यामुळें बिनविरोध निवडून आले.

### स्वदेशी विमानें

शेठ वालचंद हिराचंद ह्यांच्या नेतृत्वाखालीं विमानांचे कारखान्यांत विमानांच्या उत्पादनास लवकरच प्रारंभ होणार आहे, असें समजतें. हिंदुस्थान सरकारनें ह्या कारखान्यास १½ कोटि रुपयांची ऑर्डर दिली आहे.

### कॅनडांत औद्योगिक चलती

युद्धामुळें कॅनडाच्या निर्गत व्यापारांत मोठी भर पडली असून त्यामुळें तेथें औद्योगिक चलती आहे.

### फिनॅन्स बिल

कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें सत्तावीस विरुद्ध अकरा मतांनीं फिनॅन्स बिल पास झालें.

### रशिया व अमेरिका ह्यांमधील बोलणीं

रशिया व अमेरिका ह्यांमधील बोलणीं पुनः सुरू झालीं आहेत.

### हिंदी आर्थिक परिषद्

वरील परिषद् म्हैसूर येथें म्हैसूर विश्वविद्यालयाच्या विद्यमानें डिसेंबर अखेर प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ ह्यांचे अध्यक्षतेखालीं भरणार आहे. "आगामी जागतिक, राजकीय व आर्थिक घटना" ह्या चालू महत्त्वाच्या विषयावर त्यावेळीं चर्चा होणार असून तीस प्रारंभ प्रो. काळे ह्यांनीं करावा, असें ठरविण्यांत आलें आहे.

### ब्रिटिशांच्या विजयासंबंधीं निःशंक

"इटली युद्धांत पडला, तेव्हां पूर्व आफ्रिकेंतील लोकांस धास्ती वाटूं लागली. परंतु मध्य एशियांतील ब्रिटिश फौजा वाढविण्यांत आल्यानंतर भीति नाहींशी झाली. आतां पूर्व आफ्रिकेंतील लोकांस ब्रिटिशांच्या जयाविषयीं शंका वाटत नाहीं." असें झांजिबारमधील एक प्रमुख नागरिक, मि. तैयबअली हे एका मुलाखतींत म्हणाले.

### सोलापूर स्पिनिंग कंपनी

सोलापूर स्पिनिंग कंपनीस ३१ मार्च, १९४० अखेर संपलेल्या वर्षी सुमारें ९ लक्ष रुपये नफा झाला. ९ टक्के दरानें भागीदारांस डिव्हिडंड मिळालें.

### वहातुकीचे दर कमी केले

सरकीच्या वहातुकीचे दर जी. आय. पी. रेल्वेनें १५ ते २०% कमी केले आहेत. हे उतरलेले दर १ जानेवारी, १९४१ ते ६ जून, १९४१ अखेर अमलांत राहातील.

### जपानी लोकांचें स्वदेशीं प्रयाण

कलकत्ता येथील जपानी लोकांपैकीं कित्येक लोक स्वदेशीं परत जात आहेत. व्यापाराची मंदी, हें त्याचें कारण सांगण्यांत येत आहे.

### ६ कोटि वाळूचीं पोतीं

हिंदुस्थान सरकारनें सहा कोटि वाळूच्या पोत्यांची ऑर्डर इंडियन ज्यूट मिल्स असोसिएशनला दिली आहे. ती जानेवारी ते डिसेंबर, १९४१ अखेर पुरी करावयाची आहे.

### विमा कायद्यांत दुरुस्ती

विमा कायद्यांत दुरुस्ती करणारें बिल असेंब्लीच्या येत्या बैठकींत मांडण्यांत येईल, असें समजतें.

### ग्रेट ब्रिटनमधील युद्धविषयक धोक्याचा सक्तीचा विमा

ग्रेट ब्रिटनमध्यें मालाचा युद्धविषयक धोक्याचा विमा उतरण्याची सक्ती आहे. ह्या विम्याच्या हप्त्यांचें गेल्या वर्षी उत्पन्न सुमारें ६० कोटि रुपये झालें.

### पॉवेल्स लि.

वरील कंपनीस ३१ मे, १९४० अखेर २४,६२३ रुपये नफा झाला. भागीदारांस कर माफ ३% डिव्हिडंड मिळालें.

### ट्रेझरी बिलांवर १ रु. १ आ. १० पै व्याज

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यावर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. १ आ. १० पै पडला.

### लष्कर भरती

युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत हिंदुस्थानांत ९४,२२८ लोकांची लष्करांत भरती करण्यांत आली.

### इंडियन मिलिटरी ॲकॅडमी

येथें सध्यां १२२ उमेदवारांचें लष्करी शिक्षण चालूं आहे. ह्याखेरीज हिंदी संस्थानी लष्करासाठीं ३८ उमेदवारांचें शिक्षण चालू आहे.

### राष्ट्रभक्तांनीं काय करावें ?

ग्रेट ब्रिटनमध्यें एकाद्यानें सरकारास १०० रुपये बिनव्याजी कर्ज दिलें, तर त्या राष्ट्रास दरसाल सुमारें १½ रुपया मिळतो. उलट, त्यानें १०० रुपये दारू पिण्यांत खर्च केले, तर कराचे रूपानें राष्ट्रास ७०½ रुपये मिळतात. खरी राष्ट्रभक्ती कशांत दिसून येईल ?

### समुद्रांतील संपत्ती

एक घनमैल समुद्राच्या पाण्यांत सुमारें ११ कोटि टन मीठ व ४० लक्ष मॅग्नेशियम सांपडतें. मॅग्नेशियमची दर टनी किंमत सुमारें १,५०० रुपये आहे. एक घनमैल पाण्यांतून १,२५० टन लोखंड, ८०० टन तांबें व ११,००० टन ॲल्युमिनियमहि मिळूं शकेल. त्या खेरीज, १३५ टन चांदी व ८,६०० पौंड वजनाचें सोनेंहि त्यांत सापडेल. आयोडाइन, ब्रोमाइन, इत्यादीहि त्या पाण्यांतून निघूं शकतील. ही सर्व संपत्ती त्यांतून कशी काढून घ्यावयाची हा प्रश्न मात्र सुटलेला नाहीं.

### सर गिल्बर्ट वाइल्स, सेक्रेटरी ऑफ स्टेटचे सल्लागार

मुंबईच्या गव्हर्नरांचे सल्लागार, सर गिल्बर्ट वाइल्स, ह्यांची नेमणूक सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांनीं स्वतःचे सल्लागार म्हणून केली आहे.

### कायदेपंडिताचा लौकिक

न्यूयॉर्कमधील एका सुप्रसिद्ध कायदेपंडिताची पुढीलप्रमाणें गोष्ट सांगतात. एकदां त्यानें आरोपीतर्फे वकीलपत्र घेतलें असतांना, त्यानें ज्यूरीपैकीं एकास विचारलें, "आरोपीच्या अपराधीपणाविषयीं अगर निरपराधीपणाविषयीं तुमचा कांहीं पूर्वग्रह नाहींना ?" त्यानें उत्तर दिलें, "अर्थात् आरोपी अपराधी आहे. त्याखेरीज त्यानें तुम्हांस वकीलपत्र देण्याची काय आवश्यकता आहे ?"

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ६०२ |
| २ मध्यवर्ती विधिमंडळांत आर्थिक प्रश्नांची चर्चा | ६०३ |
| ३ बँकिंगसंबंधीं प्रश्नोत्तरें | ६०४ |
| ४ बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. ... | ६०४ |
| ५ स्फुट-विचार श्रीमच्छत्रपती सर राजाराम महाराज ह्यांचें शोचनीय निधन—ग्रीसचा पराक्रम आणि इटलीची लांडगेतोड—बाल्कन राष्ट्रांतील गुंतागुंतीची परिस्थिति—युद्ध काळांत अन्न-सामुग्रीचा पुरवठा | ६०७ |
| ६ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... ... | ६०७ |
| ७ हिंदी पोलादाचा धंदा | ६०८ |
| ८ शेती संशोधन आणि त्याचा व्यावहारिक उपयोग | ६०९ |
| ९ निवडक बाजारभाव | ६११ |



# अर्थ

बुधवार, ता. ४ डिसेंबर, १९४०


## मध्यवर्ती विधिमंडळांत आर्थिक प्रश्नांची चर्चा

मध्यवर्ती असेंब्ली व कौन्सिल ऑफ स्टेट ह्यांमध्यें गेल्या पंधरवड्यांत अनेक महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांवर चर्चा झाली. पुरवणी फिनॅन्स बिलानें सुचविलेल्या करवाढीस विरोध करण्याकरितां काँग्रेस पक्षाचे सभासद विधिमंडळांच्या बैठकीस हजर राहिले व असेंब्लीमध्यें बिलाचें पहिलें वाचन नामंजूर झालें. व्हाइसरॉयांच्या शिफारसीप्रमाणें त्याचा फेरविचारहि करण्याचें असेंब्लीनें नाकारलें. अखेर तें "सर्टिफाय" होऊन कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें गेलें व तेथें त्याचीं तिन्ही वाचनें मंजूर झालीं. बिलास व्हाइसरॉयांची मान्यता मिळून त्याची अंमलबजावणीहि आतां सुरू झाली आहे. असेंब्लींत फिनॅन्स बिलावर चर्चा झाली तिचा रोख "युद्धाच्या आणीबाणीच्या काळांत सरकारचा कारभार अत्यंत काटकसरीचा व हिंदुस्थानच्या आर्थिक व राजकीय आकांक्षांस परिपोषक असावा," ह्या आशयाचा होता.

व्हाइसरॉयांनीं ता. २० नोव्हेंबर रोजीं दोन्ही विधिमंडळांच्या सभासदांस उद्देशून भाषण केलें, त्यांत त्यांनीं हिंदुस्थानाचें आर्थिक बल वाढविण्यासाठी कसे प्रयत्न चालू आहेत, ह्याचें विवेचन केलें. सप्लाय डिपार्टमेंट युद्धप्रयत्नांस बहुमोल सहाय करीत आहे व त्यांस व्यापारी वर्गाची मदत होत आहे, असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानांतील दारूगोळ्याच्या कारखान्यांचें उत्पादन झपाट्यानें वाढत आहे. इंजिनिअरिंग स्टोर्स, तागाचा माल, इत्यादि बाबतींत हिंदुस्थानांतील उत्पादन युद्धास अतिशय उपयोगी पडत आहे. युद्धास लागणाऱ्या सामुग्रीच्या उत्पादनाचें हिंदुस्थान हें केंद्रस्थान करून, हिंदी आर्थिक सामर्थ्य त्यासाठीं एकवटण्याची आवश्यकता व्हाइसरॉयांनीं प्रतिपादली. युरोपांतील बाजारपेठ हिंदी मालास आतां बंद झाली असल्याकारणानें हिंदी मालाचा इतरत्र उठाव करण्याची जरूरी भासत आहे असेंहि ते म्हणाले. हिंदुस्थानांत तयार होणारा माल अमेरिकेंत कसा खपवितां येईल ह्याविषयीं चौकशी करण्याकरितां डॉ. ग्रेगरी व सर डेव्हिड मीक हे तिकडे गेले होते व तेथील हिंदी ट्रेड कमिशनर श्री. मलिक हे त्यांस मदत करीत होते, हें पूर्वीच प्रसिद्ध झालें आहे.

कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें पंडित हृदयनाथ कुंझरू ह्यांनीं एक ठराव मांडून, हिंदुस्थानांत मोटारी व विमानें ह्यांचे कारखाने शक्य तितक्या लवकर स्थापन करण्यांत यावे, अशी सरकारास सूचना केली. कॅनडा व ऑस्ट्रेलिया ह्या देशांत ब्रिटिश सरकारच्या सहाय्यानें मोटारी व विमानें ह्यांचें उत्पादन होत आहे, तसें हिंदुस्थानांत कां होऊं नये? डायरेक्टर जनरल ऑफ सप्लाय मि. डौ ह्यांनीं असे कारखाने तूर्त काढण्याच्या मार्गांतील अडचणींचा उल्लेख केला व व्यापारमंत्री, सर रामस्वामी मुदलियार, ह्यांनीं सरकारी धोरणाचा खुलासा केला. "हिंदुस्थानांत मोटारींचा कारखाना निघण्याचे मार्गांत व्यत्यय आणण्याचें सरकारचें धोरण नाहीं; तथापि, त्या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करणें आवश्यक आहे. हिंदुस्थानांत विमानांचा कारखाना काढण्याचे प्रयत्नांस सरकारचा विरोध मुळींच नाहीं" असें ते म्हणाले.

मि. हुसेन इमाम ह्यांनीं, हिंदी आर्थिक बलाचा युद्धप्रयत्नांस अधिकांत अधिक उपयोग व्हावा ह्या दृष्टीनें आपल्या ठरावांत कांहीं सूचना केल्या. युद्ध-काळापुरतें तरी सर्व महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें राष्ट्रीकरण करावें, जादा नफ्यावर १००% कर ठेवावा, रेल्वेजचें उत्पन्न व प्राप्तीवरील करांचें उत्पन्न ह्यांचा प्रांतिक सरकारांचा वाटा तूर्त त्यांस देऊं नये, रिझर्व्ह बँकेजवळील सोन्याची एक औंसास १४० शिलिंग ह्या दरानें किंमत ठरवावी व रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांतील रिझर्व्हमधील सरकारी रोख्यांचें प्रमाण २५% चें ३३% करावें असा त्यांच्या ठरावाचा मथितार्थ होता. ह्या प्रत्येक सूचनेस सरकारतर्फे फिनॅन्स सेक्रेटरी, मि. जोन्स, ह्यांनीं उत्तर दिलें. "उद्योगधंद्यांचें राष्ट्रीकरण केल्यानें उत्पादन अधिक चांगल्या तऱ्हेनें होईल, अशी खात्री आहे काय? जादा नफ्यावरील कराची आकारणी करण्यापूर्वींच त्याचा दर वाढविणें श्रेयस्कर होईल काय? रेल्वेजच्या उत्पन्नाचा प्रांतांस वाटा मिळत नाहीं, तेव्हां तो देण्याचें तहकूब करण्याचा प्रश्नच उरत नाहीं. प्राप्तीवरील कराच्या वाटणीचा प्रश्न हिंदी सरकारचे कक्षेंत नसून, ब्रिटिश पार्लमेंटासच फक्त त्यांत दुरुस्ती करतां येईल. सोन्याची किंमत वाढविल्यानें व सरकारी रोख्यांचें प्रमाण २५% चें ३३% केल्यानें चलनाचा अवास्तव विस्तार केल्यासारखें होईल. त्याची आज आवश्यकता नाहीं."

कौन्सिल ऑफ स्टेटनें पंडित कुंझरूंचा "हिंदी उद्योगधंदे वाढून त्यांचे हितसंबंध सुरक्षित राहतील ह्या दृष्टीनें सप्लाय डिपार्टमेंटची रचना करावी" ह्या अर्थाचा ठराव मंजूर केला. ह्या खात्यांत पुरेशा हिंदी लोकांची महत्वाच्या जागांवर नेमणूक करावी, खात्याच्या सर्व विभागांवर चांगली देखरेख असावी व इंडियन स्टोअर्स खातें निर्माण करतेवेळीं घालून दिलेलें हिंदी उद्योगधंद्यांच्या वाढीसंबंधांतील धोरण अंमलांत आणावें, असा त्यांच्या ठरावाचा मथितार्थ होता. मि. डौ ह्यांनीं सरकारतर्फे भाषण करून सप्लाय खात्याच्या कार्याचें समर्थन केलें व त्या खात्याविरुद्ध होत असलेली टीका बरोबर नसल्याचें त्यांनीं सांगितलें. अखेर, पंडित कुंझरूंचा ठराव मंजूर झाला.

युद्धपरिस्थितीस अनुसरून हिंदुस्थानांत अनेक उद्योगधंदे निघावे, ते वाढीस लागावे व ते चिरस्थायी व्हावे, अशी हिंदी लोकांची मागणी आहे. हिंदुस्थान देश आपल्या युद्धविषयक गरजा स्वतः पुरवूं शकला, तरच त्यास दुसऱ्याचे सहायास जातां येईल. सध्याच्या परिस्थितींत हिंदी आर्थिक व औद्योगिक सामर्थ्याचा ग्रेटब्रिटनला अतिशय उपयोग होणार आहे. हा उपयोग शक्य तितक्या कार्यक्षमतेनें, कमी खर्चांत व हिंदी आकांक्षांस धरून कसा होईल, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. ह्या प्रश्नाचा तात्कालिक दृष्टीनेंच केवळ विचार करून भागणार नाहीं; व्यापक व दूरदृष्टीनें त्याकडे पाहून सरकारनें आपलें धोरण आखलें पाहिजे, असा विधिमंडळांतील चर्चेचा सारांश आहे.

## बँकिंगसंबंधीं प्रश्नोत्तरें

**चेक परत येण्याचीं कारणें : चुका दुरुस्त कशा कराव्यात?**

बँकेंत भरलेला चेक कांहीं वेळां परत येतो, त्याचीं अनेक कारणें असूं शकतात. कांहीं कारणें क्षुल्लक असून, त्यांतील चूक दुरुस्त करणें सोपें असतें. ज्या बँकेवर चेक काढलेला असतो, ती बँक चेक परत करते; जीमध्यें तो भरण्यांत येतो, तिचेमार्फत तो परत येतो. बँकेनें चेकचे पैसे देण्याचें सबळ कारणाविना नाकारलें, तर बँकेस नुकसानीबद्दल जबाबदार धरतां येते.

चेकवरील तारीख अतिशय पूर्वीची असेल, तर बँका त्याचे पैसे देत नाहींत. साधारणपणें सहा महिन्यापूर्वीचे चेक बँका स्वीकारीत नाहींत. त्यापूर्वीच्या चेकवरील तारीख, चेक काढणाराकडून बदलून घेऊन नंतर तो पुनः बँकेंत भरावा.

पुढील तारखेचे चेक देण्याची पद्धत आपलेकडे सर्रास चालू आहे. चेक बँकेंत दाखल करण्याच्या तारखेपर्यंत बँकेमध्यें भरणा करतां येईल, ह्या अपेक्षेनें लोक असले चेक देतात. असे चेक ज्यांस मिळतील, त्यांनीं ते चेकवरील नेमक्या तारखेस बँकेंत भरावे. त्यापूर्वी ते स्वीकारले जात नाहींत. नंतरहि, चेक काढणाराचे खात्यावर पुरेसे पैसे नसल्यास त्यांचे पैसे दिले जाणार नाहींत.

खात्यावर पुरेशी बाकी नसली, म्हणजे बँका "चेक काढणारास विचारा" असा शेरा लिहून चेक सर्वसाधारणपणें परत पाठवितात. असा चेक परत आला म्हणजे चेक काढणारास गाठून त्याचेकडून चेकची रकम रोखीनें वसूल करावी, हें चांगलें.

कित्येक लोक चेक काढल्यानंतर त्याची रकम देण्यांत येऊं नये अशी बँकेस सूचना देतात. सहाजिकच, असा चेक बँक स्वीकारीत नाहीं. चेक 'स्टॉप' करण्याचें कारण चेक धारण करणारानें तो काढणारास विचारून आपलें हितसंरक्षण करावें.

कित्येक वेळां खातेदार आपल्या खात्यांत चेक भरतात, त्यांची वसुली झालेली नसते, परंतु ती झाली असेल ह्या अपेक्षेनें खातेदार चेक काढतो. अर्थातच बँक "इफेक्ट्स नॉट क्लिअर्ड" असा शेरा लिहिते. असा चेक परत आल्याबरोबर तात्काळ तो पुनः बँकेंत भरावा. नाहींतर, त्याच खात्यांतून दुसऱ्या एकाद्या चेकचे पैसे अगोदर दिले जाऊन एकदां परत आलेला चेक पुनः परत यायचा!

चेकवरील सही नमुन्याच्या सहीस जुळली पाहिजे. ती तशी जुळली नाहीं तर सहींत तफावत आहे, असा शेरा मारून बँक चेक परत करते. अशा रीतीनें चेक परत आल्यास, तो काढणाराची गाठ घ्यावी व चेकवरील सही बनावट असल्याचें आढळल्यास सर्व प्रकरण पोलिसाकडे सोपवावें.

चेकवर सही करण्याच्या पद्धतींत चूक झाल्यास बँक चेक परत करते. कित्येक प्रसंगीं सही करणारास त्याची चूक उमगते. ती तशी न उमगल्यास बँकरला विचारून त्याप्रमाणें सही करणें, हें इष्ट होय.

फाटलेल्या चेकचे पैसे बँका देत नाहींत. चेक रद्द करण्यासाठीच चेक मुद्दाम फाडलेला असणें शक्य असतें. चेक चुकून फाटला गेला असल्यास, तो ज्यास मिळाला असेल त्यानें चेकचे पाठीवर चेक चुकून फाटला गेला, असें लिहून सही करावी व आपल्या बँकेकडून ह्या विधानाच्या सत्याविषयीं गॅरंटी घेऊन नंतर चेक पुनः भरावा.

चेकवरील रकमेच्या लिहिण्यांत, शब्दांत व अक्षरांत तफावत पडते. अशा वेळीं चेक काढणाराकडून ती दुरुस्त करून घ्यावी.

## बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि.

(वार्षिक सभा: २९-१२-४०)

वरील कंपनीस ३० सप्टेंबर, १९४० असेर संपलेल्या वर्षी २,८३,१७२ रु. निव्वळ नफा झाला. ७२ हजार रुपये घसारा व २४ हजार रुपये मॅनेजिंग एजंटांचें कमिशन, हीं काढूनच वरील नफ्याचा आकडा आलेला आहे. त्यांतून भागीदारांस प्रेफरन्स भागांवर ५% व ऑर्डिनरी भागांवर ६% डिव्हिडंड देण्याकडे ३६ हजार रुपयांचा विनियोग करावा, २४½ हजार रुपये शेअर विक्रीच्या ब्रोकरेजचे लिहून टाकावे, डिफर्ड रेव्हेन्यू खर्चाचा आकडा ४५ हजारांनीं कमी करावा व १ लक्ष, ७७½ हजार रुपये प्राप्तीवरील कर, सुपर टॅक्स, सर चार्ज, एक्सेस प्रॉफिटस् टॅक्स वगैरेसाठी राखून ठेवावे अशी बोर्डाची सूचना आहे. साखरेवरील इक्साइज पट्टी सरकारनें १ मार्च, १९४० पासून ५०% वाढविली, त्याचा कारखान्याचे नफ्यावर परिणाम झाला. अहवालाचे वर्षी कंपनीनें २ लक्ष, ४२ हजार रुपये इक्साइज पट्टी दिलेली आहे. उत्तरेकडील कारखान्यांनीं गेल्या मोसमाचे असेरीस साखरेचे भाव उतरविले त्याचा परिणाम इकडील साखरेच्या बाजार भावावरहि झाला. युद्धामुळें रसायनें, गोणपाट, इत्यादि महाग झाल्यामुळें साखरेचा उत्पादनखर्च वाढला. ह्या सर्व परिस्थितींत कंपनीस झालेला नफा निःसंशय समाधानकारक समजला जाईल. ह्या नफ्यांतून शेअर ब्रोकरेजचा सर्व खर्च लिहून टाकून, योग्य तो घसारा काढून व डिफर्ड रेव्हेन्यू खर्चाचा आकडा निम्म्यावर आणून डायरेक्टर बोर्डानें कंपनीच्या हिशेबाची व्यवस्था समाधानकारक पायावर आणली आहे. प्राप्तीवरील कर व जादा नफ्यावरील कर किती द्यावा लागेल, ह्याचा अंदाज आज करतां येण्याजोगा नाहीं. परंतु ह्या बाबीसाठी डायरेक्टर बोर्डानें पूर्ण तरतूद केलेली आहे. त्यांतून कांहीं रकम उरल्यास; त्यांतून उरलेला डिफर्ड रेव्हेन्यू खर्च लिहून टाकावा व डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंड निर्माण करावा, अशी बोर्डाची सूचना आहे. गेल्या हंगामांत ऊंस गाळण्यास प्रारंभ थोडा उशीरा झाला, त्यामुळें त्याचा मोसम लांबला आणि साखरेच्या प्रमाणाची सरासरी त्या कारणानें थोडी खाली गेली. तथापि, साखरेस भाव चांगला मिळाल्याकारणानें त्याचा प्रतिकूल परिणाम विशेष झाला नाहीं. सप्टेंबर १९४० असेर १,७०५ एकरांत ऊंस लावण्यांत आलेला आहे, त्यापैकी ११५० एकरांतील ऊंस चालू हंगामांत गाळण्यांत येईल; ८३ एकरांचें बियाणें नवीन लावणीसाठी उपयोगिलें जाईल व ४७२ एकरांतील ऊंस १९४१-४२ च्या मोसमांत गाळला जाईल.

कंपनीचें वसूल भांडवल सुमारें ९ लक्ष रुपये असून तिचेकडे सुमारें ११ लाखांच्या ठेवी आहेत. महाराष्ट्रीय जनतेनें ह्या कारखान्याच्या उभारणीस आपुलकीनें मदत केली, त्याचें गोड फळ आज सर्वांस चाखावयास मिळत आहे. सहकार्यानें व विश्वासानें केवढें मोठें कार्य होऊं शकतें, ह्याचें बृहन्महाराष्ट्राचा कारखाना हें उत्कृष्ट द्योतक आहे. त्याच्या प्रगतीबद्दल कंपनीचें संचालक मंडळ व तिचे निरलस व मेहनती मॅनेजिंग एजंट श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे हे अभिनंदनास पात्र आहेत. सहा वर्षांपूर्वीच्या कल्पनेस आज प्राप्त झालेलें मूर्त स्वरूप त्यांस भूषणावह आहे.

## स्फुट विचार

### श्रीमच्छत्रपति सर राजाराम महाराज ह्यांचें शोचनीय निधन

कोल्हापुरचे अधिपति श्रीमच्छत्रपती सर राजाराम महाराज ह्यांच्या आकस्मिक आणि अकाली निधनानें सबंध महाराष्ट्रास धक्का बसला व हळहळ वाटली. छत्रपति राजाराम महाराज अत्यंत सच्छील, निगर्वी व कोमल अंतःकरणाचे पुरुष होते आणि त्यांचे संबंधानें कोल्हापुरांत व बाहेर सर्वांस अत्यंत आदर वाटत असे. कोल्हापुरची गादी हें महाराष्ट्रीयांचें अभिमानाचें व पूज्य भावाचें स्थान आहे. छत्रपति राजाराम महाराजांच्या कारकीर्दींत शिक्षणाचा प्रसार, शहर सुधारणा, पाण्याची सोय, उद्योगधंद्यांचा विस्तार इत्यादि अनेक मार्गांनीं कोल्हापुरांत प्रगति झाली आणि आर्थिक उन्नतीच्या कित्येक योजनांची आंखणी केली गेली. त्यांच्या अकाली निधनामुळें राजघराण्यांतील व इतर आप्तेष्ट मंडळी आणि कोल्हापूरची प्रजा ह्यांचेवर घोर आपत्ति कोसळली आहे. आपल्या दुःखांत सर्व महाराष्ट्र वांटेकरी आहे ह्या विचारानें त्यांनीं आपला दुःखावेग आवरला पाहिजे.

### ग्रीसचा पराक्रम आणि इटलीची लांडगेतोड

पश्चिमेच्या बाजूस युरोपांत जर्मनीनें एकामागून एक अनेक लहान देश पादाक्रांत केले, त्याप्रमाणें पूर्वेकडे ग्रीस देश आपण केव्हांच व्यापून टाकूं अशी इटलीची अपेक्षा होती. भूमध्य समुद्राच्या पूर्व भागांत इंग्लंडला शह देण्यासाठी मुसोलिनीनें आफ्रिकेंत व बाल्कन्समध्यें विधायक कामगिरी बजवावी अशी हिटलरची इच्छा होती आणि ही गोष्ट सुसाध्य आहे असें इटालियन सेनानींस वाटलें. आफ्रिकेंत इजिप्तच्या दिशेनें इटालियन फौजांची विशेष डाळ शिजली नाहीं. निरुपद्रवी व चिमुकलें ग्रीक राष्ट्र सहज आपल्या हातीं येईल आणि त्याच्या सहाय्यास इंग्लंड धावूं शकणार नाहीं अशी मुसोलिनीची अटकळ होती. म्हणून त्यानें हिटलरी तोडग्याचा आश्रय केला आणि ग्रीसकडे विशिष्ट ठिकाणें सोडून देण्याविषयीं तातडीची मागणी केली. ग्रीस आपलें म्हणणें नाइलाजानें तात्काळ मान्य करील ह्या समजुतीनें इटालिअन फौजांनीं तयारीनिशीं ग्रीक प्रदेशावर आल्बेनियामधून आक्रमण केलें. परंतु ग्रीक राष्ट्रानें अनपेक्षित रीतीचा कणखरपणा व निर्धार प्रकट केला आणि शत्रूच्या फौजा आपल्या मुलखांतून हाकून लावल्या, एवढेंच नसून त्यांचा पाठलाग करून आल्बेनियांत चाल केली. ब्रिटिश वैमानिक दलानें ग्रीक फौजांशीं उत्कृष्ट साथ चालविली आहे आणि ती परिणामकारक होत आहे. भूमध्य समुद्र आपल्या वर्चस्वाखाली आणून ब्रिटिश आरमाराचें बल मर्यादित करावयाचा मुसोलिनीचा बेत होता. पण ह्या बाबतींत ब्रिटिश आरमारानें इटलीवर चांगलीच मात केली आहे. इटलीच्या लढाऊ जहाजांस तोंड बाहेर काढण्याचीहि सोय राहिलेली नाहीं. ब्रिटिश आरमाराची दृष्टादृष्ट होतांच पलायन करणें एवढाच मार्ग त्यांस मोकळा राहिला आहे. ह्या भानगडींत इटलीचीं जहाजें बुडवलीं जात आहेत आणि जायबंदी होत आहेत. ह्याप्रमाणें हिटलरला इटलीचा कांहींच उपयोग झालेला नाहीं आणि मुसोलिनीच्या पदरीं आतापर्यंत अपयश व फजिती ह्यांपेक्षा अधिक कांहींच पडलेलें नाहीं. अगदी अलीकडची आलेली बातमी पहातां इटालियन जहाजांनीं पलायनाचाच पराक्रम केलेला आहे.

### बाल्कन राष्ट्रांतील गुंतागुंतीची परिस्थिति

बाल्कन्समधील लहानलहान स्वतंत्र राष्ट्रांची स्थिति चमत्कारिक आहे. जर्मनी, इटली व रशिया ह्यांच्यासारख्या बलाढ्य व महत्त्वाकांक्षी देशांशीं त्यांच्या सरहद्दी भिडलेल्या आहेत. ह्यामुळें प्रबळ शेजाऱ्यांपासून उपद्रव होण्याची भीति त्यांस सारखी वाटत असते. त्याबरोबरच त्यांची स्वतःमध्यें जूट होत असली तर गोष्ट निराळी. त्यांचें एकमेकांशीं जमत नाहीं, पण जर्मनीस किंवा इटलीस परस्परांच्या संमतीवांचून त्यांच्या बेकीचा फायदा सहज घेतां येत नाहीं. बाल्कन्समध्यें जर्मनी सारख्या बलवान राष्ट्राचें प्राबल्य प्रस्थापित होण्याची रशियास भीति वाटते, त्यामुळें ह्या देशांच्या संबंधांतल्या राजकारणांत गोंधळ माजतो. जर्मनीची इच्छा बाल्कन्समधून भूमध्य समुद्रांत घुसण्याची आणि तेथून इंग्लंडला शह देण्याची आहे. परंतु ह्यांत तुर्कस्तानचे हितसंबंध गुंतलेले असल्यानें बाल्कन्समधील राजकीय हालचालीकडे त्या राष्ट्रास डोळ्यांत तेल घालून पहावें लागतें. रुमानिया जर्मनीच्या वर्चस्वाखाली पूर्णपणें गेला आहे आणि त्या देशांत अलीकडे अंतस्थ घोटाळे व अस्वस्थता ह्यांचा प्रसार झाला आहे. बल्गेरिया व युगोस्लाव्हिया ह्यांच्या संबंधांत ढवळाढवळ करण्याचा जर्मनीचा बेत असल्याचें दिसतें. ग्रीसनें चालवलेल्या स्वातंत्र्य युद्धांत त्या शूर राष्ट्राविषयीं बाल्कन्समध्यें सहानुभूति वाटणें साहजिक आहे. तसेंच, जर्मनीच्या दंडुकेशाहीचा प्रतिकार करण्याची इच्छा त्यांचेमध्यें जागृत होणें हेंहि स्वाभाविक आहे. तथापि, ह्या भावनांस मूर्त स्वरूप देण्याचें सामर्थ्य त्यांचेमध्यें असावें तसें दिसून येत नाहीं. बाल्कन्समधल्या गुंतागुंतीच्या राजकारणामुळें जर्मनी व इटली ह्यांच्या कारवायांस आतापर्यंत अपेक्षेप्रमाणें यश आलेलें नाहीं. रुमानियामध्यें तर अंतस्थ बंडाळी होण्याचीं चिन्हें दिसत आहेत आणि आल्बेनियांत इटलीची परिस्थिति प्रतिकूल झाली आहे.

### युद्धकाळांत अन्नसामुग्रीचा पुरवठा

शांततेच्या काळांत लोकांचें मामुली रहाणीचें मान असतें, त्याच्या स्वरूपामध्यें युद्धाचे वेळीं महत्त्वाचे फेरफार होणें आवश्यक व अपरिहार्य असतें. ग्रेट ब्रिटन हा देश खाण्यापिण्याच्या पदार्थांचे पुरवठ्याचे बाबतींत कधींच स्वयंपूर्ण नव्हता आणि त्यास परदेशांतून होणाऱ्या आयातीवर पुष्कळांशीं अवलंबून रहावें लागत असे. युद्धाचे काळांत ह्या संबंधांत दोन प्रकारच्या अडचणींस त्या राष्ट्रास तोंड द्यावें लागत आहे. एक तर, लढाऊ सामानाच्या आयातीस अधिक महत्त्व द्यावें लागल्यामुळें अन्नसामुग्रीच्या बाहेरून होणाऱ्या पुरवठ्यांत बचत करावी लागते आणि लोकांनीं उपयोगांत आणावयाच्या खाण्यापिण्याच्या जिनसांस मर्यादा घालावी लागते. दुसरी अडचण शत्रूच्या हल्ल्यांमुळें होणाऱ्या जहाजांच्या नुकसानीची होय. जर्मनीनें ह्या संबंधांत प्रसिद्ध केलेल्या बातम्या अतिशयोक्तीपूर्ण असतात, ह्या विषयींचें स्पष्टीकरण वेळोवेळ करण्यांत येतें त्यावरून समजून येतें. ब्रिटिश अन्नपुरवठ्याच्या खात्याचे मुख्य, लॉर्ड वूल्टन, ह्यांनीं आपल्या एका भाषणांत आश्वासन दिलें कीं, ग्रेट ब्रिटनमधील जनतेनें खाण्यापिण्याच्या पदार्थांच्या पुरवठ्याबद्दल काळजी करण्याचें मुळींच कारण नाहीं. युद्धकाळांतहि ब्रिटिश जनतेच्या रहाणीचें मान उच्च दर्जाचें असें राहिलें असून युद्धाच्या विशिष्ट निकडीच्या गरजा लक्षांत घेऊन बाहेरून येणाऱ्या चैनीच्या वस्तूंस

लोकांनीं फाटा दिला असतां त्यांस कसलीहि वाण भासणार नाहीं असें त्यांनीं सांगितलें. अन्नसामुग्रीच्या विषयीं जर्मनी व इटली ह्या देशांची स्थिति मात्र अत्यंत असमाधानकारक झाली आहे आणि येत्या हिवाळ्यांत हलाखीची होणार आहे. जिंकलेल्या देशांत जर्मनीनें जरूरीच्या जिनसांची लूट केली तरी त्या देशांस स्वतः-सच परदेशांवर कित्येक महत्त्वाच्या खाद्य वस्तूंसाठी अवलंबून रहावें लागत असे. तेव्हां ' एकादशीच्या घरीं शिवरात्र ' अशी जर्मनीची अवस्था होणार. इटलीची बाहेरून होणारी आयात ब्रिटिश नाकेबंदीमुळें सर्वस्वी बंद झाली असल्यानें त्या देशांतील लोकांचे पोटापाण्याचे हाल झाल्यावांचून रहाणार नाहींत. ग्रेट ब्रिटनला सात समुद्र मोकळे आहेत, तशी जर्मनी व इटली ह्यांची स्थिति नाहीं. हिवाळा जर्मन जनतेस नेहमीच जाचतो आणि लोकांस कोळसा वगैरे पुरवण्यासाठी फंड उभारावे लागतात. अशा स्थितींत ब्रिटिश नाकेबंदीमुळें जर्मनी व इटली ह्यांच्या युद्ध-सामर्थ्यावर प्रतिकूल परिणाम झालाच पाहिजे. युरोपचा पश्चिम किनारा आपल्या वर्चस्वाखाली आल्यामुळें आपण ग्रेट ब्रिटनची नाकेबंदी करूं ही जर्मनीस वाटत असलेली आशा निष्फळ ठरली आहे.

---

### जमीनमहसुलाची वसुली

मुंबई प्रांतांत १९३९-४० मध्यें एकूण ३,५७,१४,००० रुपये जमीन महसूल वसूल व्हावयाचा होता, त्यापैकी ३,५३,५१,००० रुपये वसूल झाला. म्हणजे, वसुली ९९% झाली. पडलेल्या बाजार-भावांस अनुसरून शेतकऱ्यांस एकूण २,६९,००० रुपयांची जादा सूट देण्यांत आली. नेहमींच्या नियमांस अनुसरून ७२ लक्ष रुपयांची तहकुबी व १९½ लक्ष रुपयांची सूट दिली गेली ती वेगळी. मुख्यतः गुजरात व अहमदाबाद, पुणें, सोलापूर, बेळगांव, विजापूर व धारवाड ह्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांस तहकुबी व अहमदाबाद, खेडा, सुरत व धारवाड ह्या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांस सूट मिळाली. एकूण १०५० शेतकऱ्यांच्या जमिनी सरकारजमा करण्यांत आल्या होत्या, परंतु खातेदारांनीं बाकी दिल्यानंतर त्यासंबंधांतील नोटिसा रद्द करण्यांत आल्या.

---

### पोस्टाचे व तारेचे दर वाढले

१ डिसेंबर, १९४० पासून पोस्टाचे दर खालीलप्रमाणें वाढलेले आहेत:—

पाकिटें:—पहिल्या तोळ्यास १ आण्याऐवजीं १ आणा ३ पै पुढें प्रत्येक तोळ्यास ९ पै

बुकपोस्ट:—पहिल्या २½ तोळ्यांस ६ पै ऐवजीं पहिल्या ५ तोळ्यांस ९ पै. पुढें प्रत्येक २½ तोळ्यांस ३ पै.

परदेशचें टपाल:—ग्रेट ब्रिटन इ. कडे पाठवावयाच्या पत्रांस पहिल्या औंसास २½ आण्याऐवजीं ३½ आणे. पुढें प्रत्येक औंसास ३ आणे.

ब्रह्मदेशाकडे पाठवावयाच्या पत्रांस पहिल्या तोळ्यास १½ आण्याऐवजीं २ आणे. पुढें प्रत्येक तोळ्यास १ आणा.

तारा:—प्रत्येक ऑर्डिनरी तारेवर १ आणा जादा. प्रत्येक एक्सप्रेस तारेवर २ आणे जादा. वर्तमानपत्रांच्या व शुभसंदेशांच्या तारांसहि हा जादा आकार पडेल.

टेलिफोन:—ट्रंक कॉलवर १०% अधिक.


सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

' पायोनियर डाईंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth) दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखाना:—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक- दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
| --- | --- | --- |
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.

दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स
कंपनी लि० पुणें

लिख अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट पाहिजेत अर्जीवर भेटणें आहेत.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस

" जौहरे हुस्न " ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधाच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यात येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.

सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारास टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.

पत्ता:—लोकल कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर-Amritsar

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

(ले. वा. चिं. भानु)

**बोरामणी श्रीसमर्थ कन्झुमर्स सोसायटीः**—या नांवाची एक संस्था सोलापूर जिल्ह्यांत १९३८ सालीं स्थापन झाली असून सेहर्यांतील शेतकऱ्यांच्या सांसारिक गरजा रोखीच्या विक्रीनें भागवीत असते. अशा धर्तीवर ठिकठिकाणीं संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न सहकारी चळवळींत कामें करणारांनीं केला पाहिजे. असल्या संस्थांचें यश मोठ्या रकमांच्या भांडवला-पेक्षां सचोटीनें व एकनिष्ठावंतपणें काम करणाऱ्या व्यक्तींवरच अवलंबून असतें, हें मात्र संस्थापकांनीं विसरतां कामा नये.

× × × ×

**शेतकऱ्यांचें ऋणविमोचनः**—डोईजड झालेल्या कर्जाखालीं दडपून राहिलेल्या हिंदी शेतकऱ्याला वर खेंचून काढण्याच्या पवित्र उद्देशानें दरेक प्रांतांत कायदेकानू घडविले जात आहेत व त्या कायद्यांचे परिणाम शेतकरी वर्गावर व सावकार वर्गावर कस-कसे होतील हें स्पष्टपणानें सांगणारे ग्रंथहि प्रसिद्ध होत आहेत. पण एकवार ऋणमुक्त झालेला हिंदी शेतकरी पुनः कर्जबाजारी हम-खास होणार नाहीं अशी कायमची व्यवस्था करणें म्हणजे शेतीचा धंदा आंतबट्ट्याचा होणार नाहीं याची व्यवस्था करणें होय. अर्थात् परदेशच्या शेतीचे मालांचे तोडीच्या व परदेशच्या बाजारांत सहज किफायतशीर भावानें विकला जाईल अशाच मालांची पैदास होईल याची खातरजमा कोण घेणार आहे ? तसेंच शेतीच्या कामाला आवश्यक असणारा निश्चित पाणीपुरवठा यांची जबाबदारी कोणावर पडणार आहे ? आणि सरतेशेवटीं हिंदी शेतकऱ्यांच्या मालांला निदान हिंदुस्थानांत तरी संरक्षक जकातींचा पाठिंबा सरकार देणार आहे काय ? देशांतल्या देशांतील वाहतुकी-चा खर्च तरी कांहीं प्रमाणांत कमी होऊं शकेल काय ? नुसत्या कायद्याच्या जोरावर बनविलेल्या ऋणमुक्ततेनें हिंदी शेतकरी म्हणजे हिंदी राष्ट्र आर्थिक दृष्टीनें स्वतंत्र होणार नाहीं !

× × × ×

**लँड मॉर्गेज बँक्स, पंजाबः**—पंजाबमध्यें १२ लँड मॉर्गेज बँका होत्या, त्यांपैकीं २ बंद कराव्या लागल्या. पंजाबमधील अशा सर्वच लँड मॉर्गेज बँकांना आपल्या कर्जवसुलीला मोठी अडचण येते. थकबाकीचें प्रमाण वाढत चाललें आहे. आपल्या पुण्यासहि अशीच एक लँड मार्गेज बँक स्थापन झालेली आहे. व्याजाचा दर अत्यंत हलका व परत फेडीचे पुष्कळ मुदतींचे हप्ते मिळा-ल्यास शेतकरी वर्गाची उन्नति झपाट्यानें होईल या पवित्र उद्देशानेंच या संस्था निर्माण करण्यांत आलेल्या आहेत. पण जी गत पंजाबमधील लँड मॉर्गेज बँकांची तीच कमीअधिक प्रमाणानें इतर प्रांतांतल्या लँड मॉर्गेज बँकांची झाली आहे. कर्जदाराच्या वार्षिक उत्पन्नाचा गणित-पद्धतीनें हिशेब करून व भरपूर तारण घेऊनच हीं लांब मुदतीचीं कर्जें देण्यांत येतात तरीहि तीं थकूं लागतात. त्यामुळें असें मनांत येतें कीं उत्पन्न झालें नाहीं म्हणून वसूल थकतो, किंवा व्याजाचे दरच भारी (?) होते म्हणून पतपेढ्यांचीं कर्जें थकलीं असें नसून वेळच्यावेळीं आपखुषीनें वसूल देण्याची इच्छाच कर्जदारांमध्यें निर्माण झालेली नाहीं ! शिवाय पतपेढ्यांच्या वसुलीसाठीं बँकांचे इन्स्पेक्टर्स हंगामांत फिरत्या चालीत असतात, समक्ष जाऊन तगादे करितात, तरीही पुरेपूर व्याजाचा व हप्त्यांचा वसूल होत नाहीं. तेच शेतकरी लँड मॉर्गेज बँकांचा हप्ता फक्त टपालानें येणाऱ्या कागदी तगाद्यानें विनचूक देतील ही कल्पनाच कशी चमत्कारिक वाटते !

× × × ×

**प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, बिहारः**—या प्रांतिक बँकेचें भांडवल सालोसाल उतरत आहे. गेल्या ३–४ वर्षे या बँकेला आपल्या भागीदारांस भागांवर कांहीं एक डिव्हिडंड देतां आलें नाहीं. हें लक्षांत घेता मुंबईची प्रॉव्हिन्शियल बँक व आपल्या पुणें जिल्ह्याची मध्यवर्ती बँक भागिदारांस ४–५ टक्के डिव्हिडंड हमखास देते. यावरूनच दोन प्रांतातल्या सहकारी व्यवहाराची तुलना विचारप्रवर्तक नाहीं काय ?

× × × ×

**बिलासपूर सेंट्रल बँकेची रौप्यज्युबिलीः**—गेल्या एप्रिल, १९४० मध्यें मध्यप्रांतांतील या जिल्हा बँकेची पंचवीस वर्षे पूर्ण झाल्यानें रौप्यज्युबिलीचा समारंभ थाटानें झाला. ऐनवेळीं तब्येत नादुरुस्त झाल्यानें नियोजित प्रमुख पाहुणे नामदार श्री. व्ही. रामदास पंतलु हे उपस्थित होऊं शकले नव्हते; तथापि त्यांचें भाषण वाचून दाखविणेत आलें. या संस्मरणीय प्रसंगानिमित्त बँकेस जोडलेल्या सोसायट्यांच्या वैयक्त सभासदांस व बँकेच्या नोकरवर्गास त्यांच्या कामगिरीनुरूप बक्षिसें वाटण्यांत आलीं. रात्रौ सर्वांना बँकेनें भोजन दिलें व नंतर "खरा सहकारी" या नाटकाचा प्रयोग सर्वांच्या करमणुकीखातर करण्यांत आला. पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची रौप्यज्युबिली १९४२ सालांत होण्याचा सुयोग लौकरच येत आहे.

× × × ×

**सुपरवायझिंग युनियन्स, मद्रासः**—सहकारी चळवळींत अग्रेसरत्वाचा मान कर्तबगारीनें मिळविलेल्या "या प्रांतांत एकूण २५२ सुपरवायझिंग युनियन्स आहेत. त्यांवर सालिना ५॥ लाख रुपये खर्च होतात. हा खर्च सामील सोसायट्यांची वर्गणी व बँकांच्या देणग्या या मार्गानें भरून निघतो. बँकांच्या सल्ले-ल्याच्या सहकारित्वानेंच युनियन्सचा कारभार चालविणेत येतो. यद्यपि कांहीं थोड्या युनियन्सचा कारभार बरा चालला असला तरी एकंदरीनें पहाता युनियन्सचीं कामें असमाधानकारकच होतात हें नाकबूल करितां येणार नाहीं. यापुढें बँकांनीं आपल्या पगारी नोकरांमार्फतच सोसायट्यांवरची देखरेख करावी व सुपर-वायझिंग युनियन्स बंद कराव्यात असें मत चोहींकडे प्रकट केलें जात आहे" असें मत मद्रास सरकारच्या सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार यांनीं १९३९ सालच्या वार्षिक रिपोर्टांत प्रकट केलें आहे. मुंबई इलाख्यांत देखील असाच अनुभव सहकारी बँकांना येत नाहीं कां ?

× × × ×

### प्रॉव्हिडंट फंडाच्या अधिकाऱ्यांस शिक्षा

बॉंबे हिंदमाता प्रॉव्हिडंट फंडाच्या दोघा अधिकाऱ्यांस मुंबईच्या प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें शिक्षा केली होती, ती मुंबई हायकोर्टानें वाढविली. जे फंड यशस्वी होणें शक्य नाहीं, अशा फंडांत पैसे गुंतविण्यांस गरीब लोकांस प्रवृत्त करणें, हा गुन्हा आहे व त्यास कडक शासन केलें पाहिजे, असा अभिप्राय हायकोर्टानें व्यक्त केला. फंडांतील पैसे द. सा. द. शे. ७५% व्याजानें गुंतविल्याविना त्यांच्या सभासदांचे पैसे बुडाल्याखेरीज राहणार नाहींत, असेंहि हायकोर्ट न्यायमूर्ति म्हणाले.

## हिंदी पोलादाचा धंदा

युरोपांत युद्ध सुरू झाल्यापासून हिंदुस्थानांतील उद्योग-धंद्यांची विशेषतः युद्धोपयोगी धंद्यांबाबत अधिकाधिक चौकशी होऊं लागली आहे. आतांपर्यंत हिंदुस्थानची गणना शेती-प्रधान राष्ट्रांत करण्यांत येत असे व त्यांत उत्पन्न होणारे खाण्याचे पदार्थ व कच्चा माल यांच्या उत्पादनाकडे ब्रिटिश सरकारचें लक्ष असे. परंतु या युद्धाचें स्वरूप आतांपर्यंतच्या युद्धापेक्षा अनेक दृष्टींनीं निराळें असल्यामुळें हिंदी धंदे युद्धोपयोगी कसे होतील याची चौकशी आतां आस्थेवाईकपणानें होत आहे. युद्धकाळांत निघालेल्या निरनिराळ्या धंद्यांना युद्धानंतरहि टिकून रहाण्यास सरकार मदत करील असें आश्वासन सर रामस्वामी मुदलियार यांनीं दिलें आहे. स्वयंनिर्मिती व स्वयंसिद्धता या तत्त्वांची पकड सरकारच्या व बहुजन समाजाच्या मनांवर युद्धकालांत अलगद व घट्ट बसते. उद्योग-धंद्यांच्या वाढीस सरकारी सहानुभूति व मदत किती आवश्यक व फलदायी आहे याचें प्रत्यंतर हिंदी लोखंड व पोलाद या धंद्याचे संबंधांत आढळून येतें. युद्धमान राष्ट्रांना लोखंड व पोलाद यांची अतिशय गरज असते आणि ब्रिटनला हिंदी लोखंडी व पोलादी माल पुरवून युद्धांत बहुमोल मदत करण्याचें कार्य आज हिंदुस्थान करीत आहे.

टाटाचें नांव लोखंड व पोलाद यांच्या धंद्यांत अग्रेसर आहे. ह्याचीं कारणें दोन आहेत. टाटांचा १९०७ मध्यें साकचीला कारखाना सुरू होण्यापूर्वी इतरांनीं या धंद्यांत पूर्वी केलेले प्रयत्न अयशस्वी ठरले होते. शिवाय दुसरें असें कीं, आज टाटांच्या कारखान्या एवढा मोठा कारखाना दुसरा कोणताच हिंदुस्थानांत नाहीं. यामुळें सहाजिकच असें होतें कीं, टाटा कारखान्याचा इतिहास व त्याची प्रगति म्हणजे हिंदी लोखंड-पोलाद-धंद्याचाच इतिहास व प्रगति असें समजण्यांत येतें व तें योग्यहि आहे.

गेल्या महायुद्धांतच टाटांचा लोखंड–पोलादाचा-धंदा पुढें सरसावला. त्यावेळीं दोस्त राष्ट्रांना त्यांचा अतिशय उपयोग झाला. परंतु युद्ध समाप्तीनंतर धंद्याला कमालीची मंदी आली. त्यांतच युरोपांतून पोलाद स्वस्त दरानें हिंदी बाजारांत येऊं लागलें. यामुळें धंद्याची शाश्वतीच उडाल्याप्रमाणें झाली. परंतु १९२४ च्या ‘ पोलाद संरक्षण ’ कायद्यामुळें ही आपत्ति टळली. पोलादाच्या निरनिराळ्या वस्तूंच्या आयातीवर दर टनास २० पासून ४० रुपयांपर्यंत जकात बसविण्यांत आली.

परदेशी पोलादावर वरील प्रकारें जकाती बसविल्यामुळें देशी व परदेशी पोलादाच्या बाजारभावांतील पूर्वीचा फरक नाहींसा झाला. परंतु असें करूनहि हिंदी पोलादाचा उत्पादनाच्या धंद्यास किफायत अशी विशेष झाली नाहीं. शिवाय रेल्वेजना पोलादी रूळ पुरविण्याबाबत टाटांनीं करार केला होता व त्यांत वरील जकाती बसवूनहि फायदा सुटत नव्हता; म्हणून सरकारनें रुळांच्या एकंदर उत्पादनावर १९२४–२५ मध्यें दर टनास ३२ रुपये, दुसऱ्या वर्षी २६ रुपये व तिसऱ्या वर्षी २० रुपये प्रमाणें मदत देण्याचें आश्वासन दिलें.

संरक्षण देऊन सहा महिने होण्यापूर्वीच परदेशी मालाची किंमत आणखी घटली, तसेंच हुंडणावळीचा दर १८ पेन्स कायम करण्यांत आला यामुळें भाव अधिकच पडले. या परिस्थितीस तोंड देण्याकरितां सरकारनें मदतीची रकम वाढविली. पहिले वर्षभर प्रत्येक टनास २० रुपयेप्रमाणें व नंतर १८ महिनेपर्यंत प्रत्येक टनास १२ रुपयेप्रमाणें त्याचा आकार अधिक वाढविण्यांत आला.

१९२४ च्या कायद्यानें दिलेलें संरक्षण १९२६–२७ मध्यें संपलें. तत्पूर्वी पोलादाच्या धंद्याची टॅरिफ बोर्डानें फेरतपासणी केली. बोर्डाच्या मतें हिंदी पोलादास ग्रेटब्रिटनखेरीज बाकी देशांकडून स्पर्धा होते असें ठरल्यामुळें ब्रिटिश पोलादाच्या आयातीवरील जकात कमी करण्यांत आली. परदेशी पोलादाची आयात घटत चालल्यामुळें कस्टम्सचें उत्पन्न कमी होत होतें. त्याची तीव्रता या सुमारास वाढल्यामुळें सरकारनें २५ टक्क्यांनीं जकात वाढविली. ह्या जकात-वाढीचा फायदा देशी धंद्यास अर्थातच मिळाला.

१९३३–३४ मध्यें टॅरिफ बोर्डानें लोखंड-पोलाद धंद्याची तिसऱ्यानें तपासणी केली. गेल्या दहा वर्षांच्या अल्पावधींत ह्या धंद्याची स्पृहणीय प्रगति झाल्याचें अहवालांत नमूद करून यापुढें बार, पत्रें इत्यादि कांहीं विशिष्ट प्रकारच्या मालाशिवाय इतरांस संरक्षण देण्याचें कारण नाहीं असें त्यानें मत दिलें. त्याप्रमाणें पोलादाच्या बहुतेक वस्तूंवरील ‘ संरक्षक जकाती ’ नाहींशा किंवा बऱ्याच कमी करण्यांत आल्या. सरकारी उत्पन्न वाढविण्याकरितां देशी मालावर दर टनास ४ रुपये एक्साइज् ड्यूटि बसविण्यांत आली. तसेंच परदेशी मालाच्या आयातीवरहि दर टनामागें ४ रुपये जकात बसविण्यांत आली.

ह्याप्रमाणें १९२४ पासून गेलीं १६ वर्षें लोखंड व पोलाद या धंद्याला संरक्षण देण्यांत आलें. या अवधींत पिग आयर्नचें उत्पादन २००, हजार टनांवरून १,८३७ हजार टनांवर गेलें. इतकेंच नव्हे तर प्रति वर्षी साधारणपणें ५५० हजार टनांवर पिग आयर्न जपान, ग्रेट ब्रिटन वगैरे ठिकाणीं निर्गत करण्यांत आलें. हिंदुस्थानला दर वर्षी लागणाऱ्या लोखंड-पोलाद यांची १९३४ अखेरच्या दहा वर्षांची सरासरी १३½ लक्ष टन आहे. त्यापैकी टाटांचा कारखाना १० लक्ष टन पुरवितो व नवीनच सुरवात झालेली बंगाल स्टील कॉर्पोरेशन २ लक्ष टन ह्यापुढें पुरवील.

स्वयंनिर्मितीच्या मार्गावरील हिंदुस्थानची लोखंड-पोलाद यांच्या धंद्यांतील ही प्रगति स्पृहणीय आहे.

टाटांच्या कारखान्यांत १९३७-३८ वर्षांत १० कोट रुपयांच्या लोखंड पोलादाची पैदास झाली. त्यापैकी २ कोट २० लक्ष रुपये मजुरी दिली होती.

१ कोट ६५ लक्ष रुपयांची रेल्वे वहातूक झाली, ३६ लक्ष रुपयांचे इन्कम व सुपर टॅक्स भरले; व २ कोट २८ लक्ष रुपयांची डिव्हिडंड वाटण्यांत आली. १९३८ मध्यें लोखंड व पोलाद शुद्ध करणाऱ्या खात्यांत दररोज काम करणाऱ्या कामगारांची सरासरी संख्या २८,२४९ भरली.

देशी धंद्यास प्रथमावस्थेंत आवश्यक असणारें उत्तेजन व संरक्षण दिलें असतां अन्तीम यश व राष्ट्रजीवनास बळकटी कशी येते याचें लोखंड-पोलाद धंदा हें उत्कृष्ट प्रतीक आहे. हिंदी माणसें व्यापारधंद्यांत कधअरसल नाहींत याची ग्वाहीहि यामुळें सर्वत्र पसरली जात आहे.

## शेती संशोधन आणि त्याचा व्यावहारिक उपयोग

इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च ह्या अखिल भारतीय संस्थेच्या विद्यमानें शेतीच्या धंद्याचे सुधारणेविषयीं शास्त्रीय संशोधन विस्तृत प्रमाणावर चाललें आहे हें प्रसिद्धच आहे. शास्त्रज्ञांनीं शोध करून शेतीविषयक सुधारणा सुचवल्या असतां त्यांचा उपयोग शेतकऱ्यांस प्रत्यक्ष त्यांच्या कामांत व्हावा ह्यासंबंधानें व्यवस्था करणें अत्यंत महत्त्वाचें आहे. पिकांचे नवीन नमुने, जमीनीच्या मशागतीच्या सुधारलेल्या तऱ्हा, पिकांस होणाऱ्या रोगांवर उपाय, जनावरांचें आरोग्य व त्यांची चांगली पैदास, इत्यादि अनेक बाबतींत शेतकऱ्यास सहाय्य देणें शक्य असून त्याचा खर्च मर्यादित होईल आणि उत्पन्न वाढेल अशी तजवीज होणें आवश्यक आहे. इंपीरिअल कौन्सिलच्या सल्लागार मंडळाची सभा अलीकडे भरली होती, तीमध्यें शेतीच्या कित्येक सुधारणांबद्दल शिफारस करण्यांत आली. शास्त्रज्ञांनीं सुचविलेल्या योजनांचे प्रयोग विशिष्ट क्षेत्रांमध्यें शेतांवर करावयाचें ठरलें. व्हर्जीनिया जातीच्या तंबाखूचें बीं तयार करण्याचा प्रयत्न इंपीरिअल कौन्सिल करीत आहे. म्हैसूर संस्थानांत शेंगदाणा तयार करणें, ओरिसांत लवंगांची सहकारी पद्धतीनें विक्री, बंगालमध्यें भातास होणाऱ्या रोगांची चौकशी आणि ज्वारीच्या साठवणीमुळें उत्पन्न होणारी कीड इत्यादि बाबतींत सुधारणेचे प्रयत्न व्हावेत असें सुचवण्यांत आलें आहे. समुद्र किनाऱ्यालगतच्या खाऱ्या जमिनींत भाताची लागवड कशी करतां येईल ह्याविषयींचे प्रयोग करण्याचाहि विचार झाला.

शेतीच्या जनावरांस क्षयासारखे रोग वाढत्या प्रमाणांत होत असल्याचें आढळून आलें आहे. ह्या रोगानें पिडलेल्या जनावरांचा संसर्ग इतरांस लागूं नये अशी व्यवस्था करणें अगत्याचें आहे, पण तज्ज्ञांनीं सुचवल्याप्रमाणें रोगी जनावरांचा नाश करणें शक्य नसल्यानें तीं बाजूस काढण्याची व्यवस्था व्हावी असें सुचवण्यांत आलें आहे. चांगल्या दुधाचा पुरवठा खेडेगांवांतून शहरांस व्हावा ह्याविषयींहि कांहीं शिफारशी करण्यांत आल्या. लोकरीची पैदास आणि चांगल्या दर्जाच्या मेंढ्यांची निपज ह्या विषयाची चर्चा झाली. लोकर खरेदी करणारे व्यापारी आणि लोकरीची पैदास करणारे धनगर ह्यांच्या सहकार्यावर जोर देण्यांत आला. हिंदुस्थानांतील मेंढ्यांची पहाणी प्रथम करून निरनिराळ्या जातींच्या मेंढ्यांच्या गुणधर्मांची नोंद करावी आणि ह्या माहितीच्या आधारावर पुढें बाजाराच्या मागणीस अनुसरून त्या जनावरांची उत्पत्ति करावी असा निष्कर्ष चर्चेमधून निघाला. लोकरीच्या संबंधानें शास्त्रीय संशोधन करण्यासाठीं स्वतंत्र केंद्र निर्माण करावें आणि ह्याबाबतची योजना इंपीरिअल कौन्सिलच्या व्हेटेरनरी खात्याच्या डायरेक्टरांनीं तयार करावी असें ठरलें. लोकरीच्या बनावटीचे धंद्याचे संबंधानेंहि सुधारणा सुचवण्याकरितां एक योजना तज्ज्ञांकडून तयार करून घ्यावी असेंहि सुचवण्यांत आलें.

### फिनॅन्स बिलाचा कायदा झाला

मध्यवर्ती असेंब्लीनें अमान्य केलेलें फिनॅन्स बिल कौन्सिल ऑफ स्टेटमध्यें मान्य होऊन त्यास कायद्याचें स्वरूप दिलें असल्याचें व्हाइसरॉयांनीं जाहीर केलें आहे. पोस्टाचे वगैरे वाढवलेले दर तात्काळ अमलांत आले आहेत.

## जागतिक व्यापार

मासिक उत्पादनाचे आकडे हल्लीं फारच थोडीं राष्ट्रें प्रसिद्ध करीत आहेत. प्रसिद्ध झालेल्या आकड्यांवरून अमेरिकेनें सतत प्रगति दर्शविली आहे, असें आढळतें. जूनमध्यें लोखंडाचें उत्पादन ३० टक्क्यांनीं व पोलादाचें ४० टक्क्यांनीं वाढलें. जानेवारीपेक्षा मेमध्यें सिमेंटचें उत्पादन १०० टक्क्यांनीं वाढलें. सिमेंट व शिसें यांचा साठा जानेवारी ते मे पर्यंत स्थिर होता. पेट्रोलचा साठा मेपर्यंत वाढला होता, परंतु जूनमध्यें पुनः तो स्थिर झाला. कथील व टीनचा साठा मात्र सतत वाढत आहे.

### मालाच्या किंमती

युद्धाच्या सुरवातीला सर्व राष्ट्रांत मालाच्या किंमती भरमसाट वाढवण्यांत आल्या होत्या; परंतु हळुहळु त्या आतां स्थिर होत आहेत. दक्षिण आफ्रिका, अर्जेंटाईन, कॅनडा व अमेरिका येथें पूर्वींचे भाव आतां स्थिर करण्यांत आले आहेत. रुमानिया, स्वित्सर्लंड व ग्रेट ब्रिटनमध्यें भाव जरी कमी होत असले तरी युद्धापूर्वीची स्थिति अद्याप आली नाहीं.

### राष्ट्रसंघाची सद्यःस्थिति

हल्लीं राष्ट्रसंघाचीं आर्थिक, सामाजिक आरोग्यविषयक वगैरे उपयुक्त कामें अमेरिकेंतून चालवलीं जात आहेत. मजूर कचेरी कॅनडांत मॉंट्रिअल ह्या शहरीं आहे व मुख्य कचेरी जीनीव्हा व लंडन येथें काम करीत आहे. उपयुक्त वाङ्मय निर्माण करण्याचा प्रयत्न इतक्या अडचणींतूनही चालला आहे. पूर्वीइतकी माहिती मात्र हल्लीं मिळणें दुरापास्त झालें आहे.

दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड

**व्याजाच्या दरांत बदल**

बँकेचे खातेदार, ठेवीदार व बँकेशीं व्यवहार असणाऱ्या सर्व लोकांस विनंतीपूर्वक कळविण्यांत येतें कीं, ता. १ जानेवारी १९४१ पासून बँकेची मुख्य कचेरी व डेक्कन जिमखाना शाखेकडील खात्यांवरील व्याजाचे दर बँकेच्या मुंबई शाखेप्रमाणें चालू खातीं १ टक्का व सेव्हिंग्ज बँक खातीं २ टक्के याप्रमाणें केले जातील.

पुणें शहर, ता. २५-११-१९४० M. V. Gokhale, मॅनेजर.

**मधुमेहावरील औषध**




तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

—मागविण्याचा पत्ता—


मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.

# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट

१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर




लायसेन्सची जरूर नाहीं

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखवल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ४५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२-आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हंशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॅचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारांस सहा घड्याळें बक्षिस आणि टपाल हंशील माफ.

पत्ताः—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर (India.)



# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.



## महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११२—६ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—९ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९२—५ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०२—० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९१–१० |
| २½% १९४८–५२ ... ... ... | ९५–१२ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०५—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०५—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६१) ... ... | ११०—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१—० |

### मंडळ्यांचे भाव

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% ... ... | १३६—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १०२—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३९–१४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५०—० |
| पायोनियर मॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०३–१२ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉम्बे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२९—४ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १४९०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६५०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९८—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६०—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९९७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% ... ... ... | ७६५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २१६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४५–१२ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१—२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३९—६ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३६५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २३८—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १४६—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३६८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८९२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १२५–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४१-१३-३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६१–११ |


# दि गुड–वुइल
## ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर

देशी औषधें तयार करणारा
महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना
पंडु, (अॅनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

अशक्ततेवर

# रक्तवर्धक

वापरा.

सर्वत्र मिळतें.

—: केंद्रें :—

पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

## आयुर्वेद रसशाळा
## पुणें, लि. पुणें ४.

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचे तेल



डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात, गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.

धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)

तमाम दंत रोगांच्या बाधा करून दांत अगदी स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!

पोरवाल

व्हाईट टूथ पावडर

पोरवाल अँड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

जर्निमन टेलर व्हा.

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडेमी**, ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.

**For Collegians**

Wooden & Iron Furniture

FOR SALE AND HIRE

Your Popular Old Shop

**SHEVAK BROS.**

*Work-Shop Address:*
153 Kasaba,
Poona 2

*Branch No. 1*
Shevak Quarters,
near Fergusson College
Poona 4

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

**अर्थशास्त्र**

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**महायुद्धाची जाणीव!** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

वंबाचे माडीवर

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद् वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.